# ई - पोलीस पत्रिका

दि.०३/०९/२०२४ अनु.क्र.१५९

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-१/पो.अधि.अति.कार्यभार/७७५३/२०२४ अमरावती शहर दिनांक २७/०८/२०२४**

## आदेश

श्री आसाराम चोरमले, पोलीस निरीक्षक, नेमणुक, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, अमरावती शहर यांचेकडे पुढील आदेशा पर्यंत प्रशासकीय कारणास्तव, तात्पुरत्या स्वरुपात पोलीस निरीक्षक, पो.स्टे. नांदगाव पेठ, अमरावती शहर या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येत आहे.

**२.पोआअ/पशा-१/पो.अधि.अति.कार्यभार/७७५४/२०२४ अमरावती शहर दिनांक २७/०८/२०२४**

## आदेश

श्री. जयदत्त भंवर, सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग, अमरावती शहर यांचे कडे पुढील आदेशा पर्यंत प्रशासकीय कारणास्तव, तात्पुरत्या स्वरुपात सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा, अमरावती शहर या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येत आहे.

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/लांजेवार/७५८४/२०२४ अमरावती शहर दिनांक २२/०८/२०२४**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा दिनांक ०४.०१.२०२४ ते दिनांक ०७.०६.२०२४ पर्यंतचा रुग्णनिवेदन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार खालील नमुद केल्या प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.क्र./ नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| १ | मपोहवा/१०७६, अनिता लांजेवार | पो.स्टे. गाडगेनगर | दि.०४/०१/२०२४ ते दि.०२/०३/२०२४ पर्यत ५९ दिवस परिवर्तीत रजा | **नियम ६१ नुसार** |
| | | | दि.०३/०३/२०२४ ते दि.०७/०६/२०२४ पर्यत ९७ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ५० नुसार** |

**२.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/७७६७/२०२४ अमरावती शहर दिनांक २८/०८/२०२४**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखे पासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१६३४, अस्मिता खांडवाये (किरसान) | पो.स्टे. फ्रेजरपुरा | दि.२०/११/२००८ | दुसरी | दि.३०/०९/२०२४ | १ |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**३.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/७६८७/२०२४ अमरावती शहर दिनांक २६/०८/२०२४**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपनाकरीता विशेष रजा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम व ब.नं. व नांव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोहवा/६२२,कविता देशमुख (पोलीस मुख्या) | दि.०५/०३/२००८ | २ | जुळे (पहिल्या) | ३० दिवस |
| २ | मपोहवा/१३१९,जयश्री गोळंबे (बडनेरा) | दि.०८/०५/२००७ | २ | दुस-या | ३० दिवस |
| ३ | मपोहवा/२६२,प्रगती शिरनाथ (पोलीस मुख्या) | दि.२१/०६/२००९ | १ | पहिल्या | ३०दिवस |
| ४ | मपोशि/२९९,अनिता तायडे (पोलीस मुख्या) | दि.०४/०६/२००९ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ५ | मपोशि/१६४२,तृप्ती बनसोड (पोलीस मुख्या) | दि.०३/०३/२०२४ | १ | पहिल्या (प्रसुतीला जोडुन) | ६० दिवस |
| ६ | मपोशि/५०७,कल्पना तोटे (राजापेठ) | दि.२१/०२/२०२४ | २ | दुस-या (प्रसुतीला जोडुन) | ६० दिवस |
| ७ | मपोना/२६४,स्वाती बाजारे (नियंत्रण कक्ष) | दि.२२/०२/२०२४ | २ | दुस-या (प्रसुतीला जोडुन) | ६० दिवस |

अ.क्र. ५,६ व ७ वगळुन इतर महिला पोलीस अंमलदार यांना निवडणुक कालावधीत रजेवर सोडण्यात येवु नये.

**अटी व शर्ती :-**

१. मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ./मपोना-२११ कविता शिरसाठ/७६९९/२०२४अमरावती शहर दि.२६/०८/२०२४**

## आदेश

**संदर्भ:-** १) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन/ए.सी.बी/मनापोशि-२११ कविता शिरसाठ/१०९५२/२०२१ दिनांक ०१/१२/२०२१

२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोशि/१३७७ विरेंद्र सिसोदे+३/२०७७/२०२२ दिनांक ०४/०३/२०२२

**विषय :-** निलंबन कालावधी निश्चित करणे बाबत...

--000--

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये मपोना/२११ कविता शिरसाठ, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणूकीस असूनत्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा, अमरावती शहर येथे अप.क्र. १८७९/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला होता त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ/विचौ-१/निलंबन/ए.सी.बी/म.नापोशि-२११ कविता शिरसाठ/१०९५२/२०२१ दि. ०१/१२/२०२१ अन्वये निलंबीत करण्यांत आले होते तसेच या कार्यालयाचे आदेशक्रं.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोशि/१३७७ विरेंद्र सिसोदे + ३/२०७७/२०२२ दिनांक ०४/०३/२०२२अन्वये निलंबनातुन मुक्त करण्यांत आले आहे.

तरी त्यांचा महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (१) (बी) नुसार दिनांक ०१/१२/२०२१ पासून ते दिनांक ०४/०३/२०२२ पावेतो निलंबन कालावधी हा**"जसाचे तसा"(As Such)** करण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### वार्षीक वेतनवाढ

**१. पोआअ/आस्था-वेनिलि/१ जुलै काल्प.वे.वाढ/७७१६/२०२४ अमरावती दिनांक २८.०८.२०२४**

### आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८.०६.२०२३ अन्वये जे पोलीस अधिकारी/अंमलदार दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची आर्हताकारी सेवा पुर्णकेली आहे, अशा सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदारांना दिनांक ०१ जुलै रोजीचीकाल्पनिक (Notional) वेतनवाढ विचारात घेऊनत्यांचे सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्ती विषयक लाभ सुधारीत करण्यात यावेत तसेच सदर लाभ सुधारीत करण्यात आल्यानंतर सदर कर्मचा-यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकाच्या मागील ०३ वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जेकमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन परिपत्रका नुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या सोबतच्या विवरण पत्रात नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१ जुलै रोजीचीकाल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१ जुलैच्या काल्पनिक वेतन वाढीसह सदर विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांचे नावा समोरील **स्तंभ क्र.०७** मध्ये नमूद केलेले वेतन विचारात घेऊन त्या नुसार सेवानिवृत्तीवेतन, सेवानिवृत्ती उपदान, रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण सुधारीत करण्यात यावे. सुधारीत सेवानिवृत्ती वेतनाच्या थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी विवरण पत्रात **स्तंभ क्र.०९** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्या नुसार सदर कालावधीत सेवानिवृत्ती वेतनाच्या फरकाची थकबाकी अदाकरण्यात यावी.

सदर काल्पनिक वेतन वाढीनुसार सुधारीत केलेल्या सेवानिवृत्तीवेतन उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण या सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभांच्या फरकाची थकबाकी यापूर्वी अदाकरण्यात आलेल्या रकमेशी समायोजीत करुन अदाकरण्यात यावी.

# विवरणपत्र

दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक (NOTIONAL) वेतनवाढ मंजूर करणे बाबत.

| अ.क्र. | पदनाम व बक्कल क्रमांक | दि. 30 जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीच्या दिनांकाची वेतनश्रेणी | सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | दि.01 जुलै रोजीच्या काल्पनिक वेतनवाढी नंतर सेवा निवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | अर्ज सादर केल्याचा दिनांक | सुधारीत सेवानिवृत्ती वेतनाची थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | से.नि. मपोना/1080 | शोभा रामचंद्र टाले | 30.06.2020 | एस-9 : .26400-83600/- | रु.42300/- | रु.43600/- | 18.07.2024 | 18.07.2021 ते 17.07.2024 |
| 2. | से.नि. सपोउपनि/413 | मोहन धुमसिंग राठोड | 30.06.2017 | एस-10 :.29200-92300/- | रु. 44100/- | रु.45400/- | 08.08.2024 | 08.08.2021 ते 07.08.2024 |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस